**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अभिषेक सुभाष हरिदास
अे/४-३, आंचल हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
राहुल नगर समोर, कर्वे पुतळ्याशेजारी,
कोथरुड, पुणे-४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,
मुंबई- ४०० ००१

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,
मुंबई- ४०० ००१

**२.जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,**
महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण संचालनालय,
प्रादेशिक कार्यालय, ४१२/ई, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९९/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कर्नाटक राज्य मुक्त विद्यापीठ म्हैसुरचे पदवीधारक महाराष्ट्र राज्यातील तंत्र निकेतनामध्ये अधिव्याख्याता म्हणून काम करु शकतात का, इत्यादीबाबत खुलासेवजा स्वरुपाची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. अभिषेक सुभाष हरिदास यानी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नंदकुमार सिताराम चौधरी
श्री.संत ज्ञानेश्वर हौसिंग सोसायटी,
नंदनवन निवास, मु.पो.ता.मोहोळ,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,**
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन,
गुरु नानक नगर, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
भिमा विकास विभाग नं.२, मोहिनी नगर,
होटगी रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३७/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.नंदकुमार सिताराम चौधरी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संभाजीराव दिनकरराव सावंत
३७, वसंत कॉलनी, वसंत मार्केट यार्ड समोर, **अपीलकर्ता**
सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली-४१६ ४१५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली-४१६ ४१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१८/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संभाजीराव दिनकरराव सावंत यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्रामबाग, सांगली यानी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.परशराम मारुती इंगवले
मु.पो.किडगांव, ता. व जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती जावली (मेढा),
ता.जावली, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत मालचौंडी, पो.निजरे,
ता.जावली, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६९/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत मिळकत क्र.१४७ ला श्री.मनोज रमेश कदम यांचे नाव दाखल करणेसंदर्भातील कार्यवाहीची कागदपत्रे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.परशराम मारुती इंगवले यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे मूळ प्रतीत नसून छायाप्रतीत केलेले आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.सुनिता कांताराम फुलसुंदर
फ्लॅट नं.२०२, सर्व्हे नं.६७/१ बी, **अपीलकर्ता**
प्लॉट नं.१७, इंद्रायणी विहार,
विद्यानगर, पुणे-३२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,**
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका**
कामायनी विद्यामंदिर, निगडी,
सेक्टर नं.२४, प्राधिकरण, पुणे-४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१५/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वार्षिक वेतनवाढ देणे / काढून घेणे संदर्भात विशेष शाळा/कर्मशाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयासंदर्भातील इतिवृत्ताची प्रत | |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.सुनिता कांताराम फुलसुंदर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कामायनी विद्यामंदिर, निगडी, पुणे यानी दिलेले उत्तर योग्य आहे. पुन्हा पुन्हा एकाच संस्थेकडे एकाच संदर्भात अर्ज /अपिले करुन सर्व यंत्रणांच्या वेळ व कार्यशक्तीचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. अपीलकर्त्या सौ.सुनिता कांताराम फुलसुंदर यानी मागणी केलेल्या माहितीमध्ये सार्वजनिक हिताचा कोणताही भाग अंतर्भूत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळासाहेब तुळशीराम आंधळे
सुखकर्ता, अ-१०, माणिक चौक, राजगुरुनगर,
ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा. धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,
आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७७/ पुणे + २१३७/पुणे + १२८१/पुणे + १२८२/पुणे + २७८४/पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाळासाहेब तुळशीराम आंधळे यानी आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेची सन १९८७ पासूनची विविध स्वरुपातील माहिती मागितली असून ती न मिळाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ही संस्था व श्री. आंधळे यांच्यामध्ये मतभेद आहेत. संस्थेत भ्रष्टाचार होत असल्याने व तो उघड होऊ नये म्हणून माहिती दिली जात नाही, असा श्री. आंधळे यांचा आरोप आहे. मात्र वेळोवेळी सर्व माहिती

दिली असून अपीलकर्त्यांसमवेतच्या अन्य अपीलकर्त्यांनी माहिती मिळाल्याचे व तक्रार नसल्याचे लेखीही दिले आहे. संस्थेला त्रास देण्यासाठी व व्यक्तिगत काम करुन घेण्यासाठी श्री. आंधळे विविध पातळयांवर अर्ज, अपिले, तक्रार व पत्रव्यवहार करीत आहेत, असे म्हणणे संस्थेने दाखल केले आहे.

श्री. आंधळे यांच्या याच स्वरुपाचे अपील क्र.२००६/४३१/०२ बाबत राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई व अपील क्र. १६/पुणे मध्ये राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांनी यापूर्वी आदेश दिलेले आहेत.

उभय बाजूंच्या निवेदनांमध्ये याच बाबींची पुनरावृत्ती होत असल्याचे दिसून येते. एकाच व्यक्तीने एकाच संस्थेबाबत वादापोटी त्याच त्याच स्वरुपाची व व्यापक माहितीची केलेली मागणी आणि परस्परांनी केलेले आरोप-प्रत्यारोप या करिता आयोगासह सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती खर्ची घालणे योग्य नाही. म्हणून अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास त्यानी अभिलेखांचे अवलोकन करावे. जन माहिती अधिकारी यानी असे अवलोकन उभयमान्य वेळेनुसार त्याना करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांची लेखी मागणी त्यानी केल्यानंतर त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन त्याना पुरवाव्या, अशी कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे.

खुलासा, स्पष्टीकरण, अन्वयार्थ, आरोपांची शहानिशा करुन निष्कर्ष काढणे या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यांत येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विष्णु आनंदा माने
मु.गोठेवाडी, पो.विसापूर, **अपीलकर्ता**
ता.तासगांव, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७५/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तक्रार अर्ज एकतर्फी निकाली काढलेसंदर्भातील खुलासेवाजा स्वरुपातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विष्णु आनंदा माने यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्याच्या मूळ माहिती-मागणी अर्जान्वये केलेली मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गुरुराज दिलीप पोरे
९/२, नीलानगर, बुधवार पेठ, **अपीलकर्ता**
सोलापूर-४१३ ००२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जनरल मॅनेजर (एच.आर.डी.),**
सेंट्रल बँक ऑफ इंडिया,
चंद्रमुखी, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाप्रबंधक,**
सेंट्रल बँक ऑफ इंडिया आंचलिक कार्यालय,
३१७, एम.जी.रोड, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८८/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सेंट्रल बँक ऑफ इंडिया मार्फत सोलापूर कार्यक्षेत्रात सन १९८५ पासून विविध शासकीय योजनातंर्गत करण्यात आलेल्या कर्जवाटपाबाबतची विहित नमुन्यात माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.गुरुराज दिलीप पोरे यानी राज्य माहिती आयोगाकडे ज्या 'सार्वजनिक प्राधिकरणा' विरुध्द अपील केले आहे, ते प्राधिकरण केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेत येत

असल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने आवश्यक तर केंद्रिय माहिती आयोग, क्लब बिल्डिंग, ५ वा मजला, ब्लॉक नं.४, जुने जे.एन.यु. कॅम्पस, नवी दिल्ली -११००६७ यांच्याकडे इंग्रजी अथवा हिंदी भाषेमध्ये अपील करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कृष्णांत रामचंद्र शेळके (पाटील)
मु.शेळकेवाडी, पो.सोनगांव, **अपीलकर्ता**
ता. व जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती सातारा,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत शेळकेवाडी,
ता. व जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८१/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत शेळकेवाडीच्या डिसेंबर २०१० ते मार्च २०११ या कालावधीतील मासिक सभांच्या इतिवृत्तांच्या प्रती तद्नुषंगिक एकूण ५ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.कृष्णांत रामचंद्र शेळके (पाटील) यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याने मागणी केल्यानुसार अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. व जि.सातारा यानी अभिलेख अवलोकनासाठी

उपलब्ध करुन द्यावे व अपीलकर्त्याच्या लेखी मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती सशुल्क पुरवाव्यात. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अनिल बाबुराव सिदकर
गुरुदत्त हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
महाबळेश्वर, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
महाबळेश्वर नगरपरिषद,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा आवेक्षक,**
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७६/२०११/सातारा |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.अनिल बाबुराव सिदकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिका-यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश राजाराम पुराणिक
तानसेन संगीत विद्यालय,
रामराज पार्क, फ्लॅट नं.१०,
४ था मजला, चिंचवड, पुणे-४११ ०३३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
करआकारणी व करसंकलन कार्यालय,
पिंपरी - चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११ ०१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (कर),**
चिंचवड विभागीय कार्यालय, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१४/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००२-२००५ या कालावधीत संस्थेवर लावलेला मिळकत कर व्यवसायिक दराऐवजी रहिवासी दराने आकारावा व त्यावर आकारलेला दंड परत मिळावा. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुरेश राजाराम पुराणिक यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी केलेली मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम,.२००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३०.७.२०११**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.यशवंत मलकप्पा बनसोडे
१५६, तक्षशीलनगर, कुमठानाका,
टिव्हीदूर केंद्रासमोर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक,**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (गृहनिर्माण),**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९९/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.यशवंत मलकप्पा बनसोडे (वय ८८ वर्षे) यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याने सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत तक्रार

केल्याचे दिसून येते. चौकशी करुन अहवाल देणे, कार्यवाही करणे या बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तथापि अपीलकर्त्याचे वय लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यानी सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत केलेल्या मूळ तक्रारीवरील कार्यवाहीची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (गृहनिर्माण), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी अपीलकर्त्यास त्वरित कळवावी. चौकशीबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती व चौकशी पूर्ण झाली असल्यास चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल आयोगास दि.२०.८.२०११ पर्यंत सादर करावा.

**पुणे.**
**दि :- २६.७.२०११**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कृष्णदेव भुजंग जाधवर
मु.पो.चुंब, ता.बार्शी, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,**
कृषि उत्पन्न बाजार समिती,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
बार्शी, ता.बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२६/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.कृष्णदेव भुजंग जाधवर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी

यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने  या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-  ३० जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राकेश सुरेशराव माने
रि.स.नं.५४९/५०, प्लॉट नं.६५, **अपीलकर्ता**
स्वातंत्र्य सैनिक वसाहत,
राजेंद्रनगर, कोल्हापूर

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
एन.के.जी. एस.बी. सहकारी बँक लि.,
रि.स.नं.१९५५, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,
कळंबा रोड, कोल्हापूर-४१६ ०१२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००४/२०११/कोल्हापूर<br>२०१०/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.राकेश सुरेशराव माने यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ.

आवश्यक कागदपत्रे जोडलेले नाही. तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नाही.

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संकय्या शिवलिंगय्या मठपती
मु.पो.हलकर्णी, ता.गडहिंग्लज, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक**
श्री.विरशैव लिंगायत ट्रस्ट समाज हलकर्णी
ताराबाई पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३७/२०११/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणीः-**<br><br>१.आण्णासाहेब हलकर्णी यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीतील सोने तारण लिलावाची माहिती<br><br>२. विरशैव लिंगायत समाज ट्रस्टच्या लेखापरीक्षणाबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संकय्या शिवलिंगय्या मठपती यानी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दगडू पंढरीनाथ जाधव
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, **अपीलकर्ता**
श्री कृष्ण कॉलनी, मु.पो.ता.बार्शी,
जि.सोलापूर-४१३ ४११

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४९/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तालुका दंडाधिकारी कार्यालय बार्शी येथील चॅप्टर केस क्र.४४६/३ संदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.दगडू पंढरीनाथ जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

यांच्या कडून प्राप्त झालेला अहवाल विचारात घेता अपीलकर्ता जाधव याना उपलब्ध माहिती दिली असल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामदास धोंडीबा साळुंखे
सर्व्हे नं. ९३, ए, लोकमान्य हौसिंग सोसायटी,
हनुमान नगर ब-१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे - १६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग नियंत्रण क्र. ३ पुणे
महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे - ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बां.नि/वि.यो.झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रामदास धोंडीबा साळुंखे
सर्व्हे नं. ९३, ए, लोकमान्य हौसिंग सोसायटी,
हनुमान नगर ब-१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे - १६

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बां.नि/वि.यो.झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,

| | |
|---|---|
| | पुणे श्री. सुरेश एकनाथ देसाई |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विनापरवाना बांधकामाबाबतची माहिती मागितली होती व या बांधकामावर कारवाई करण्याची मागणी केली होती. कागदपत्रे पाहण्यास येण्यास सांगितले. परंतु मी गेलो तेव्हा अभिलेख अवलोकनाची वेळ संपून गेलेली हाती.

जन माहिती अधिकारी -अपीलकर्त्यांच्या दि.२०.९.२०१० च्या अर्जाला दि.१५.१०.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन अभिलेख अवलोकन करण्याबाबत कळविले.तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कागदपत्रांच्या प्रती नेण्यासाठी कळविले. परंतु ते आले नाहीत.

बांधकामाबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार व त्यावरील कारवाईबाबतची मागणी हा भाग प्रशासकीय कार्यवाहीचा आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बां.नि/वि.यो.झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. सुरेश एकनाथ देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग नियंत्रण क्र. ३ पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. हेमंत देवधर यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष निवृत्तीराव पवार
मु.पो.किवळे, उत्तमनगर, देविवनच्या मागे,
देहूरोड, ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,
१९/२१, मनोहरदास रस्ता, मंबई ४०० ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,
१९/२१, मनोहरदास रस्ता, मंबई ४०० ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. सुभाष निवृत्तीराव पवार<br>मु.पो.किवळे, उत्तमनगर, देविवनच्या मागे, देहूरोड, ता. हवेली, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, मंबई यांचे प्रतिनिधी श्री. संजीव शांताराम शेवाळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कार्यालयीन कामकाजासंबंधीचे नियम व सेवाशर्ती, तसेच माझ्यासह काही कर्मचाऱ्यांची पदोन्नती, बदली याबाबतच्या कार्यवाहीविषयीच्या खुलाशासह कागदपत्रांच्या प्रती इ. माहिती मागितली होती. फक्त दोन मुद्दयांची माहिती दिली. अन्य माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी प्रशासकीय कार्यवाहीबाबतची तक्रार व माहिती अशी संमिश्र विचारणा केली आहे. बदल्या, ले ऑफमधील कर्मचाऱ्यांना दिलेली नुकसान भरपाई, शासनाकडून मंजूर होऊन आलेल्या पदांनुसार मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यानी केलेल्या नियुक्त्या इ. बाबींविषयीची तरतूद त्या त्या आदेशात स्पष्टपणे नमूद आहे. त्यांच्या सर्व तक्रारींबाबत वेळोवेळी खुलासा केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता प्रशासकीय कार्यवाही-बाबतची अपीलकर्त्यांची तक्रार व आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असलेल्या अधिकाराची, तसेच कर्मचाऱ्यांना नेमण्यासंबंधीच्या सेवाशर्तींची प्रत जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि:- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. अंजली नंदकुमार गुंड
८०६, सोमवार पेठ, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. वडगाव मावळ, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा करविभाग,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. वडगाव मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. अंजली नंदकुमार गुंड
८०६, सोमवार पेठ, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. वडगाव मावळ, जि. पुणे
यांचे प्रतिनिधी श्री. युवराज लक्ष्मण विरणक

**जन माहिती अधिकारी** तथा करविभाग,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. वडगाव मावळ,
जि. पुणे श्री. गोरखनाथ यशवंत बुटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आमच्या मालकीच्या मिळकतीतील भाडेकरुंची नावे भोगवटादार म्हणून लावली आहेत. या मिळकतीचे मालकी हक्क, खरेदी खत, वहिवाटदारांच्या नावाच्या नोंदींची तारीख व तपशील, कराची आकारणी याबाबतचा खुलासा मागितला होता. परंतु योग्य माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - मालक सदरी अपीलकर्त्यांच्या वडिलांचे नाव असून भोगवटादार सदरी भाडेकरुंची नावे आहेत. माहितीबाबत मुद्देनिहाय उत्तर दिले आहे.अन्य बाबी कायदेविषयक अन्वयार्थाच्या असून त्याचे उत्तर देता येत नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित सर्व संचिका दाखवून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्याची तयारी दर्शविली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता कायदेशीर बाबींच्या अन्वयार्थाशी निगडित अशा स्वरुपाच्या माहितीची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत अच्युत पाटील
स.नं.८/२+३, प्लॉट नं. ३, घर नं. ५१,
स्वामी विवेकानंद नगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र.४
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९८१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अनंत अच्युत पाटील
स.नं.८/२+३, प्लॉट नं. ३, घर नं. ५१, स्वामी विवेकानंद नगर, धनकवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. के. सी. कारकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र.४
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. वैभव भानुदास कडलाख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सर्व्हे क्र. ८, मौजे धनकवडी येथील मिळकत क्र. ४८ च्या नोंदीबाबतचे दस्तऐवज पुराव्यासह मिळण्याची मागणी केली होती. परंतु तशा दस्तऐवजांच्या प्रती दिल्या गेल्या नाहीत. उलट मिळकतीवर असलेल्या मिळकतकराची बाकी भरुन माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यानी कळविले. सर्व्हे क्र. ८ हा १६ एकरचा असून त्यामध्ये माझी मिळकत कोणती, हे अधिकाऱ्यांनी मला दाखवावे.

जन माहिती अधिकारी - ग्रामपंचायतीकडील संबंधित भाग महानगरपालिकेत हस्तांतरण करताना जी कागदपत्रे उपलब्ध झाली त्या सर्वांच्या प्रती अपीलकर्त्यांना दिल्या. ग्रामपंचायतीकडील रेकॉर्डच्या नोंदींसह सर्व रजिस्टरसही अपीलकर्त्यांना दाखविली. सन १९९७ मध्ये ग्रामपंचायतीकडील जसे व जेवढे कागदपत्रे मिळाले ते सर्व अपीलकर्त्यांना दिले असून त्या व्यतिरिक्त माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची अन्य मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश पो. खळदे
रक्षक नगर, फेज २, बिल्डिंग नं. ८,
चंदननगर, खराडी, पुणे - १४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे - १
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुरेश पो. खळदे
रक्षक नगर, फेज २, बिल्डिंग नं. ८, चंदननगर, खराडी, पुणे - १४

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री. सी.ए.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री संताजी महाराज जगनाडे पालखी सोहळा मंडळ, श्री क्षेत्र सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे या संस्थेकडे निधीच्या हिशेबासह विविध प्रकारची माहिती मागितली होती. परंतु संस्थेकडून ती न मिळाल्यामुळे धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे मागितली. गेल्या २० वर्षात संस्थेने नियमानुसार धर्मादाय कार्यालयाकडे दाखल करणे आवश्यक असलेले लेखा तपासणी अहवाल पाठविलेले नाहीत. धर्मादाय आयुक्त कार्यालयाने संस्थेक्डून मागवून घेऊन त्याच्या प्रती दिल्या पाहिजेत.

जन माहिती अधिकारी - श्री संताजी महाराज जगनाडे पालखी सोहळा मंडळ, श्री क्षेत्र सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे या संस्थेने लेखा तपासणी अहवाल सादर केलेला नाही. नियमानुसार त्याबाबत कार्यवाही केली जाईल.

लेखा तपासणी अहवाल श्री संताजी महाराज जगनाडे पालखी सोहळा मंडळ श्री क्षेत्र सुदुंबरे,ता.मावळ,जि.पुणे या संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास द्यावी व लेखा तपासणी अहवाल संस्थेकडून प्राप्त होताच अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तम नारायण होले
मु. पो. कासुर्डी, ता. दौंड, जि. पुणे ४१२ २१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,
दौंड, ता.दौंड जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५५/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. उत्तम नारायण होले
मु. पो. कासुर्डी, ता. दौंड, जि. पुणे ४१२ २१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट रोड,
पुणे श्री. पोपट बाळाजी भालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,
दौंड, ता.दौंड जि. पुणे श्री. डी.जी.घाडगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - राखीव वनातील वृक्षतोड व इतर प्रकरणामध्ये दोषी व्यक्तींविरुध्द व वन खात्याच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार करुनही कारवाई केली जात नाही व योग्य माहिती दिली जात नाही. श्री. दौलत ढोंबरे यानी वन विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्यामुळे त्यांच्यापासून आमच्या जिवाला धोका असून तक्रारीबाबत त्वरित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांना संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या असून त्याची पोहोचही घेण्यात आली आहे. या प्रकरणी त्यानी वेळोवेळी केलेल्या अर्जांची व पत्रव्यवहाराची दखल घेण्यात आली असून त्या त्या वेळी त्याना उत्तर व माहिती देण्यात आली आहे. त्यानी तक्रार केलेल्या गुन्हयासंबंधी चौकशी चालू असून ती अद्याप पूर्ण झालेली नाही. चौकशी पूर्ण होताच सहाय्यक वनसंरक्षक, पुणे यांच्याकडील आदेशानुसार अंतिम कारवाई करण्यात येणार आहे.

सदरील निवेदनाबाबतचा तपशील देणारे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य तक्रारी गंभीर स्वरुपाच्या व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्या तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण तुकाराम घोरपडे
एम-५/४४, निसर्ग हौसिंग सोसायटी, अपीलकर्ता
सर्व्हे नं. १०/१४, गोल्फ क्लब रोड, येरवडा, पुणे -४११ ००६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, मलनिसारण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५
उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, मलनिसारण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नारायण तुकाराम घोरपडे
एम-५/४४, निसर्ग हौसिंग सोसायटी,
सर्व्हे नं. १०/१४, गोल्फ क्लब रोड, येरवडा, पुणे -४११ ००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, मलनिसारण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. नरेंद्र श्रीपती साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, मलनिसारण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. इंद्रभान निवृत्ती रणदिवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- माझ्या परिसरातील लोकांना नियमितपणे पाणीपुरवठा होत असताना माझा पाणीपुरवठा मात्र बंद केला. त्याचे कारण काय ? अस्पृश्य म्हणून असे केले जाते काय ? या बाबतची विचारणा केली होती. परंतु नेमके उत्तर मिळाले नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी मत व्यक्त करुन अनेक प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. त्याना नेमकी कोणती माहिती हवी, हे स्पष्ट होत नसल्यामुळे तशी विचारणा करणारे व मुद्देनिहाय उत्तर दिले. त्यांच्या बंद नळजोडामध्ये अंतर्गत स्वरुपाची अडचण असल्यामुळे नळजोडणी इतर लाइनमधून रितसर ट्रान्स्फर करुन घ्यावी, असे त्याना कळविले. त्यांच्या अर्जान्वये त्यानुसार पूर्तता केल्यावर त्याना सुरळीतपणे पाणीपुरवठा होत आहे. अन्य कोणत्याही बाबींचा यात संबंध येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अर्जात केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. तसेच त्यांची तक्रार प्रशासकीय स्वरुपाची असून त्याबाबतही कार्यवाही झाल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुरुलिंग मन्मथ गवसणे
'अमरक्लासिक', सी-३, हॉटेल मालिनी शेजारी,
हडपसर, पुणे - २८. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील दक्षिण सोलापूर कार्यालय, जि. सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील दक्षिण सोलापूर कार्यालय, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील दक्षिण सोलापूर कार्यालय, जि. सोलापूर श्री. दिपक मच्छिंद्र वजाळे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील दक्षिण सोलापूर कार्यालय, जि. सोलापूर श्रीमती शुभांगी किशोर जाधव

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. अरुण जनार्दन भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गुरुलिंग मन्मथ गवसणे यानी त्यांच्या सन २००४ मधील प्रवास भत्त्याच्या देयकाबाबत माहिती मागितली होती. २/३ अर्जांद्वारे याच स्वरुपाची माहिती त्यानी मागितली असून ती देण्याचे आदेश तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री. कांबळे यांना सूचना देऊनही त्यानी माहिती विलंबाने दिली. त्यामुळे टपालाने निःशुल्क पाठविली. श्री. कांबळे यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली असून तत्कालीन निवासी नायब तहसीलदार श्री. अरुण जनार्दन भोसले यांच्यावर ठपका ठेवण्याची शिक्षा देण्यात आली आहे. श्री.गवसणे यांच्या अपील क्र. २४७६/२००९/पुणे मध्ये आयोगाने या कारवाईस मान्यता दिली आहे. श्री. गवसणे यांची सर्व देयके अदा करण्यात आली असून गैरहेतुने ते सातत्याने अर्ज व अपिले करीत आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील दक्षिण सोलापूर कार्यालय, जि. सोलापूर श्री. दिपक मच्छिंद्र वजाळे यानी लेखी व तोडी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शशिकांत बापू निकाळजे
औंध चेस्ट हॉस्पिटल, कामगार वसाहत,
पुणे ४११ ०२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५५/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. अतुल भि. चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. विष्णु सा.तोंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

क्वीन्स गार्डनमधील एका शासकीय बंगल्याचा वापर एक रिक्षावाले अनधिकृतपणे गेल्या ७ वर्षापासून करीत असून पुरावे देऊनही त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. तसेच त्याबाबत योग्य माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार श्री. शशिकांत बापू निकाळजे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

संबंधित रिक्षावाल्याची पत्नी अधीक्षक अभियंता यांच्या घरी कामाला असून शासनाच्या नियमानुसार तेथील निवास्थानात त्यांचे कुटुंब रहाते. संबंधित व्यक्तीचा पती तेथे राहणे नियमबाहय नाही. त्यानी कोणता व्यवसाय करावा, हा स्वतंत्र प्रश्न आहे. नियमातील तरतुदींची सर्व माहिती अपीलकर्त्यास पुरविली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी अपीलकर्त्याला रजिस्टर्ड टपालाने पाठविलेली नोटीस परत आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. विष्णु सा.तोंडे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. अतुल भि. चव्हाण यानी केले.

संबंधित रिक्षावाल्यावर कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. फिरोज अकबर शेख
पर्णकुटी पायथा, सर्व्हे नं. ११, येरवडा, पुणे ४११ ००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
पुणे शहर, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी ई विभाग,
येरवडा, पुणे ४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७५/२०१०/शेख |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. ज्ञानेश्वर जवंजाळ | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. फिरोज अकबर शेख यानी एका व्यक्तीचे छायाचित्र सादर करुन शिधापत्रिका कार्यालयात शिधापत्रिकेवर शिक्के मारणारा हा अधिकारी कोण, अशी विचारणा केली होती व त्याबाबतची

विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. एखादी बाहेरील त्रयस्थ व्यक्ती  कार्यालयात बसून या प्रकारचे अनधिकृत काम करीत असल्याची तक्रार त्यानी केली असून संबंधित व्यक्ती कार्यालयात चौकशीसाठी आलेली असताना काढलेले छायाचित्र सादर केले आहे. त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले आहे. वस्तुतः तक्रार करणारा अपीलकर्ता हे स्वतःच कार्यालयीन कामाच्या वेळेनंतर अनेक प्रकारची कामे घेऊन येऊन कर्मचाऱ्यांना त्रास देत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, येरवडा, पुणे

श्री. श्रीकांत शिंदे यानी केले.

अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. त्यांच्या अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेन्टस्, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे ४११ ००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका,पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२११/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/१०/२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेन्टस्, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका,पुणे श्री. अनिरुध्द पावसकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६/७/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे या अपिलाची सुनावणी दि. २३/१०/२००८ रोजी घेण्यात आली.

पुणे महानगरपालिकेने टीडीआर देण्यास सुरुवात केल्यापासून ते आजपर्यंत अशा स्वरुपात दोन समित्यांचा तपशील व अहवालाच्या प्रती याची मागणी अपीलकर्ता श्री. रमेश दिनकर पुंडे यानी केली होती. ती न मिळाल्याचे कारणावरुन त्यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित प्रकरणातील दोन समित्यांपैकी एक समीचा तपशील उपलब्ध नसल्याचे अपीलकर्त्यांनी कळविले होते व अन्य समितीने अहवाल सादर केला नसल्यामुळे प्रत देता येत नसल्याचेही स्पष्ट केले होते. दि. २४.१०.०८ रोजी श्री. पुंडे यांच्याशी झालेल्या चर्चेप्रमाणे देशपांडे समितीच्या संदर्भातील त्याना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि. ३/११/२००८ च्या पत्रान्वये देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी दि. १७/९/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका,पुणे श्री. अनिरुध्द पावसकर यानी माहिती-मागणीच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अधिक तत्परतेने कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ५ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शांतीलाल जुगराज कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी सल्लागार,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ विधी सल्लागार,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. विधी सल्लागार,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ॲड.मंजुषा इधाटे

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ विधी सल्लागार,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ॲड.निशा चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शांतीलाल जुगराज कावेडिया यानी महानगरपालिकेच्या संदर्भात एका कायदेशीर बाबीविषयीचे अभिप्रायवजा स्पष्टीकरण मागितले होते. संबंधित तरतूद कोणत्या नियमात आहे, याचे उत्तर विहित मुदतीत दिले व अन्य विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या 'माहिती' च्या संज्ञेत येत नसल्याचे कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्र. विधी सल्लागार, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ॲड. मंजुषा इधाटे यानी कळविले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कयामुद्दीन बाबुलाल शेख
मु. पो. माळेगाव बु ।।, ता. बारामती, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगमब्रीज जवळ, पुणे ४११ ००१
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस उप अधीक्षक (मुख्यालय),
लोहमार्ग पोलिस मुख्यालय, खडकी, पुणे ४११ ००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस उप अधीक्षक (मुख्यालय),<br>लोहमार्ग पोलिस मुख्यालय, खडकी, पुणे श्री. अनीस अहमद सुलेमान काझी | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कयामुद्दीन बाबुलाल शेख यानी सन २००८ मधील लोहमार्ग पोलिस भरतीच्या संदर्भातील माहिती मागितल्याचे म्हटले असले तरी त्यांचा पहिला अर्ज कार्यालयाला प्राप्त झाला झाला नव्हता. प्रथम अपिलामुळे त्यांच्या अर्जाबाबत कळविल्यानंतर उत्तर देऊनही त्यानी संपर्क साधला नाही. त्यानंतर अन्य अर्जाद्वारे त्यानी सन २०१० मधील भरतीची माहिती मागितली. कळविलेले शुल्क भरल्यानंतर ती त्याना रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलिस उप अधीक्षक (मुख्यालय), लोहमार्ग पोलिस मुख्यालय, खडकी, पुणे श्री. अनीस अहमद सुलेमान काझी यानी केले. याच आशयाचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे लेखी निवेदन त्यानी सादर केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही कार्यवाही रास्त असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत माहिती-मागणी अर्जावर व प्रथम अपिलावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. याची समज जन माहिती अधिकारी तथा पोलिस उप अधीक्षक (मुख्यालय), लोहमार्ग पोलिस मुख्यालय, खडकी, पुणे श्री. अनीस अहमद सुलेमान व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगमब्रीज जवळ, पुणे डॉ. डी. पी. प्रधान यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९ मारुती आळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९ मारुती आळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे श्री. पांडुरंग माणिकराव भालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, शिरुर नगरपरिषद, घोडनदी,
ता. शिरुर, जि. पुणे श्री. राजेंद्र गोपाळराव वाघमारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ४ अर्जांद्वारे नगरपालिकेकडे विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकार व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती ज्या विभागाकडील होती त्या विभागाकडे अर्ज वर्ग करुन प्राप्त होताच माहिती दिली. त्या दरम्यान विधानसभा निवडणुकीचे कामकाज चालू होते व विविध मुद्दयांची माहिती संकलित करुन द्यावयाची होती. त्यामुळे विलंब झाला.

माहिती-मागणीच्या ४ अर्जांवर एकत्रित अपिल करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५- नुसार प्रत्येक अर्जानुसार उत्तर/माहिती विहित मुदतीत देणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे श्री. राजेंद्र गोपाळराव वाघमारे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद, घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे श्री. पांडुरंग माणिकराव भालेकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला,
पुण्याईनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१) पुणे,
स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३०/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं. २९, ४ था मजला, पुण्याईनगर, धनकवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.केदारी नारायण जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१) पुणे, स.नं.५८२/डी, गुलटेकडी,

| | | |
|---|---|---|
| | मार्केटयार्ड, पुणे श्री. किरण अभिमन सोनवणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- स्कायलाईन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या संस्थेच्या अ-धारिकेतील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. संबंधित संस्थेचा पत्ता जन माहिती अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देऊनही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - संबंधित अ-धारिका शोधूनही आढळली नसल्याचे व त्यामुळे त्यातील कागदपत्रांच्या प्रती देता येत नसल्याचे विहित मुदतीत कळविले. संस्थेचा नोंदणी क्रमांक आदि तपशील अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात दिला नव्हता. कार्यालयाच्या विभाजनामध्ये मागितलेली माहिती नेमकी कोणत्या कार्यालयाच्या कक्षेतील आहे हे हा तपशील देण्यात आला नसल्याने स्पष्ट होत नाही. अपीलकर्ता विविध सहकारी गृहरचना संस्थांबाबत अशा स्वरुपाची माहिती मागत असतात. त्यानी मागितलेली माहिती सहकारी अधिकारी (श्रेणी-१) पुणे उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हर्षकुमार पो. बम्ब
३६, कोहिनूर प्लॅनेट, स. नं. १३/६, औंध, पुणे-७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्याधिकारी (भूमिप्रापण),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (भूमिप्रापण),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्याधिकारी (भूमिप्रापण),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. हेमंत निकम

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (भूमिप्रापण),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. ललित मधुकर बेंद्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. हर्षकुमार पो. बम्ब यानी एका मिळकतीच्या साईटप्लॅनची मागणी केली हाती. त्यासाठी मिळकत पत्रिका/ ७/१२ उतारा जमा करुन योग्य ते शुल्क भरणेबाबत विहित मुदतीत कळविले होते. अपीलकर्त्यांनी पूर्तता न करता या उत्तरावर नियमावली आदि माहिती मागणारा अर्ज सादर केला. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते गैरहजर होते. कळविलेल्या बाबींची पूर्तता केल्यास माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (भूमिप्रापण), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. ललित मधुकर बेंद्रे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे
१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची,
ता. खेड, जि. पुणे ४१२ १०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे
१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड,
जि.पुणे श्री.धनंयज सदाशिव कोळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे श्री. संजय खंडू गिरमे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आळंदी नगरपालिकेत सातत्याने भ्रष्टाचार चालू असून मागितलेली माहिती मुदतीत व परिपूर्ण दिली जात नाही. रस्त्याच्या कामाबाबतच्या गुणवत्ता नियंत्रण अहवालाच्या प्रती मुदतीत मिळाल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचे सातत्याने अर्ज असतात व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली जाते. कर्मचारी कमी असल्यामुळे एवढया मोठया प्रमाणावर माहिती संकलित करुन देणे अशक्य होत आहे. तरीही उपलब्ध माहिती दिली आहे व आणखी कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

अपीलकर्ता यानी विशिष्ट कालावधी नमूद न करता विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. तरीही अधिनियमानुसार विहित मुदतीत अर्ज व प्रथम अपिलावर कार्यवाही होणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे श्री. संजय खंडू गिरमे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे श्री. धनंजय सदाशिव कोळेकर यांना देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन रामचंद्र पवार
चतु:श्रृंगी, वैदुवाडी, पुणे ४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (महसूल),
पुणे विभाग, विधानभवन, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधानभवन, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मोहन रामचंद्र पवार
चतु:श्रृंगी, वैदुवाडी, पुणे ४११ ०१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (महसूल),
पुणे विभाग, विधानभवन, पुणे श्री. सुभाष रामचंद्र धर्माधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधानभवन,
पुणे श्री. वैभव वि. नावडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विभागीय आयुक्तांकडील विविध ३ प्रकरणांसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले अहवाल व एका बांधकाम प्रकरणातील नोटिशीवरील आयुक्तांनी केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल याच्या प्रती मागितल्या होत्या. परतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - संबंधित अहवाल अद्याप अप्राप्त असल्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले. संबंधित प्रकरणात बांधकामबंदीचा आदेश अद्याप देण्यात आलेला नाही.

अपिलीय प्राधिकारी - खाजगी विकसक व खाजगी जमीन या संदर्भात भ्रष्टाचाराचा अपीलकर्त्यांचा आक्षेप आहे. मूळ अर्जानुसार उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवेदनात नमूद आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडील अहवाल अद्याप अप्राप्त असल्यामुळे त्याची प्रत देता आलेली नाही. त्यांच्या मूळ तक्रार अर्जावर निर्णय झालेला नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही रास्त आहे. अन्य बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. यशवंत रावजी जगताप
मु. पो. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. यशवंत रावजी जगताप
मु. पो. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती,
ता. बारामती, जि. पुणे श्री. विजयसिंह देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती,

| | |
|---|---|
| | ता. बारामती, जि. पुणे श्री. गोरख दशरथ कुंभार |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. यशवंत रावजी जगताप यानी आपल्या पत्नीचे नाव मतदार यादीत नसल्याबाबतची तक्रार केली होती व त्या अनुषंगाने खुलाशाच्या स्वरुपात माहिती मागितली होती. सर्व कागदपत्रांच्या प्रती व स्पष्टीकरण त्याना देण्यात आले. संबंधित प्रकरणी हस्तदोषामुळे नाव वगळले जाण्याबाबत तलाठी श्री. सुनिल उध्दवराव इंगुले याना ताकीद देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे श्री. गोरख दशरथ कुंभार व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी उपविभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे श्री. विजयसिंह देशमुख यांनी केले.

माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रतिक प्रमोद आडकर
५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा बिल्डिंग,
ब्लॉक नं. २०४, पुणे ४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
बाल विकास मंदिर प्राथमिक शाळा, लोकमान्य नगर,
पुणे ४११ ०३०

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
बाल विकास मंदिर प्राथमिक शाळा, लोकमान्य नगर,
पुणे ४११ ०३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. प्रतिक प्रमोद आडकर<br>५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा बिल्डिंग, ब्लॉक नं. २०४, पुणे<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,<br>बाल विकास मंदिर प्राथमिक शाळा, लोकमान्य नगर, पुणे सौ. उज्ज्वला महादेव लोखंडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - शाळेबाबतच्या सेवा शर्ती, नियम, शिक्षक व मुख्याध्यापिकांची कर्तव्ये इ. माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बाल विकास मंदिर प्राथमिक शाळा, लोकमान्य नगर, पुणे यांच्याकडून ती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली नाही. आयोगाकडून सूचना दिल्या गेल्यानुसार ऑगस्ट २००९ मध्ये माहिती दिली. तोपर्यंत अपिलीय प्राधिकाऱ्यांची नेमणूकही संस्थेने केलेली नव्हती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी -अपीलकर्त्यांच्या दि.१९/३/२००९ च्या अर्जाला दि.१३/४/२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले.

विद्यमान जन माहिती अधिकारी - जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नेमणुका सुरुवातीला केलेल्या नव्हत्या. नंतर त्या करण्यात आल्या.

अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून बव्हंश मुद्दे नियमावली-संदर्भातील आहेत. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील आहे, असे म्हणता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. मात्र संबंधित संस्था अनुदानित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती व ठळकपणे त्याबाबतचे फलक लावण्याची कार्यवाही त्वरित न केल्याबद्दल बाल विकास मंदिर,लोकमान्यनगर, पुणे या संस्थेला समज देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास पाठविलेल्या उत्तराची नोंद असलेल्या जावक बारनिशीतील छायांकित प्रत ३ दिवसांत सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापिका, बाल विकास मंदिर प्राथमिक शाळा, लोकमान्य नगर, पुणे सौ. उज्ज्वला महादेव लोखंडे यानी दि. २९/६/२०११ च्या पत्रानुसार प्रत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- १२ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वनाथ महादेव वाळुंज
मु. नांदुर, पो. कळंब, ता. आंबेगाव, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. विश्वनाथ महादेव वाळुंज<br>मु. नांदुर, पो. कळंब, ता. आंबेगाव, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. वसंत मारुती गाडेकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - मंडल अधिकारी, कळंब याना न्यायालयाच्या निर्णयानुसार क्षेत्राची नोंद होण्याबाबत केलेल्या अर्जाच्या चौकशीकामी मागणी करुनही माहिती दिली नाही. याबाबतच्या कार्यवाहीची व मंडल अधिकाऱ्यांबाबतची माहिती मागितली होती. अर्ज मिळत नसल्याचे ते सांगतात. परंतु माझ्याकडे अर्जाची पोहोच आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्ता दाखवीत असलेली पोहोच आमच्या कार्यालयाची नाही.

ग्रामपंचायत निवडणूक मतमोजणी कार्यक्रमामुळे सुनावणीला उपस्थित राहता येत नसल्याचे विनंतीपत्र अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सादर केले होते. अपीलकर्ता यानी अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी याना सादर करावी व त्यानंतर एक आठवडयात जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याना माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. पी. आर. कोद्रे यानी दि. ३०.६.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांच्या अर्जाची पोहोच व त्या अनुषंगाने केलेली चौकशी याचा अहवाल सादर केला.

अपीलकर्ता यानी जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केलेला नाही. आयोगाकडील अर्जाची छायांकित प्रत प्राप्त करुन घेतली असून टपाल कार्यालयाचा शिक्का दिसतो. परंतु टपाल कार्यालयाचा शिक्का असलेल्या त्यांच्या अर्जाची प्रत अपीलकर्त्यांना कशी प्राप्त झाली, हे स्पष्ट झालेले नाही. तसेच घोडेगांव टपाल कार्यालयाचा शिक्का या प्रतीवर नाही. त्यामुळे त्यानी अर्ज दाखल केलेला नसल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपील न करता त्यानी थेट आयोगाकडे अपील केले आहे. मात्र त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या प्रती टपालाने पाठविल्या आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. पी. आर. कोद्रे यानी अहवालात नमूद केले

आहे. हा अहवाल लक्षात घेता अपीलकर्त्यांची तक्रार निरर्थक व दिशाभूल करणारी ठरते. त्याबाबत त्याना ताकीद देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गिरीश प्रभाकरराव तेलंग
फ्लॅट नं. १, अप्पर ग्राऊंड फ्लोअर,
८२८, सदाशिव पेठ, कोकाटे सदन, पुणे - ३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गिरीश प्रभाकरराव तेलंग
फ्लॅट नं. १, अप्पर ग्राऊंड फ्लोअर, ८२८, सदाशिव पेठ, कोकाटे सदन, पुणे

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरुणा चव्हाण

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पीएच.डी.प्रवेश परीक्षेतील सवलतीबाबतचे नियम व त्यानंतर झालेले बदल, संशोधन केंद्रांची यादी व त्यांच्याकडे अवलंबिलेली प्रवेश प्रक्रिया आदिंच्या अनुषंगाने १८ केंद्रांची माहिती मागितली होती. संबंधित संशोधन केंद्राबाबतची माहिती त्यांच्याकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यानी कळविले. मात्र त्या संस्थांनी आपल्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे सांगितले. पीएच.डी. प्रवेश परीक्षेत अन्याय झाला असल्यामुळे विद्यापीठाच्या कुलगुरुंकडे तक्रार केली असता त्यानी पुरावा आणण्यास सांगितले. म्हणून संबंधित दोन संशोधन केंद्रांकडून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती मागवून द्यावी.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा अर्ज दि.३/५/२०१० रोजी प्राप्त झाला. दि.३१/५/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. विषयात बदल मागणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी आदि माहिती संबंधित संशोधन केंद्रांकडून घ्यावी हे कळविले, कारण १८ संशोधन केंद्रे असून त्यांच्याकडील कागदपत्रे विद्यापीठाकडे नाहीत.

तत्कालीन अधिष्ठाता - सर्व प्रक्रिया नियमानुसार पार पाडण्यात आली. विषय बदलण्याबाबत त्या त्या पातळीवरुन आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार दिले. झालेल्या बैठका, प्रवेशाची यादी आदि सर्व बाबी संकेत स्थळावरुन जाहीर केल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी तक्रार व माहिती असे संमिश्र स्वरुपातील अर्ज केले असून त्या अनुषंगाने माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.परंतु संशोधन केंद्र असणाऱ्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी म्हटले असले तरी या संस्थांनी उक्त अधिनियम लागू नसल्याचेमुळे माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे. वस्तुत: विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यक्रमातील प्रक्रिया राबविणाऱ्या संस्थांनी

त्याबाबतची माहिती दिली पाहिजे, परंतु त्या संस्था ती देत नसतील, तर ती उपलब्ध करुन देणे ही विद्यापीठाची जबाबदारी ठरते. म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास हव्या असलेल्या दोन संशोधन केंद्रांच्या संस्थाकडील माहिती मागवून अपीलकर्त्यास एका आठवडयात पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित संस्थांकडून माहिती मागवून अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरुणा चव्हाण यानी आयोगास अवगत केले. पीएच.डी प्रवेश प्रक्रिया, मुलाखतीचा कार्यक्रम आदिबाबत अपीलकर्त्यांनी केलेली तक्रार व घेतलेले आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रदीप जयसिंगराव रणनवरे
आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे,
ता. आजरा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे,
ता. आजरा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,<br>आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे, | |

| | |
|---|---|
| | ता. आजरा, जि. कोल्हापूर यांचे वतीने ॲड. राहुल देसाई |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मूळ अर्जदार श्री. लक्ष्मण गणपती सावंत यानी मागितलेली माहिती आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे या कारखान्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरुन नाकारली होती. परंतु ती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिले. विघ्नहर सहकारी साखर कारखानाप्रकरणी रिटयाचिका क्र. ८३८२/२००८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सहकारी साखर कारखान्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ. पी. एल. खंडागळे यानी दिलेला हा निर्णय बेकायदेशीर असून तो रद्द करावा. मूळ अर्जदार श्री. लक्ष्मण गणपती सावंत हे केवळ त्रास देण्यासाठी सातत्याने कारखान्याकडे अर्ज करीत असून आता पर्यंत त्यानी १७ अर्ज केले आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड. राहुल कृ. देसाई यानी केले.

मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ८३८२/२००८ प्रकरणी दिलेला निर्णय सरसकट सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भातील नसून केवळ विघ्नहर्ता सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भातील आहे. प्रस्तुत अपिलातील आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे हा साखर कारखाना माहितीच्या अधिनियमातील कलम (२) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरतो की नाही, हे ठरविण्यासाठी साखर कारखान्याला शासनाकडून मिळणारी मदत/सवलत इ. तपशील जन माहिती अधिकारी यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानी तो सादर केला नाही, म्हणून तो सादर करण्याचे आदेश आयोगाने अपिलीय प्राधिकारी याना दिले. त्यानुसार लेखाअधिकारी, साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यानी दि. ६/४/२०११ च्या पत्रान्वये साखर कारखान्यांबाबतची एकत्रित माहिती सादर केली. त्याचे अवलोकन करता दि. ३१.३.२०१० अखेर शासनाकडून मिळालेली रक्कम व साखर कारखान्याने परत फेड न केलेली (थकित) रक्कम पुढील प्रमाणे आहे-

अ) भाग भांडवल रु. १०६२.५० लाख, ब) शासकीय थकहमीवरील वित्तीय संस्थांच्या ( ११४०.७९ पैकी ) कर्जाची येणे बाकी ६५०.८४ लाख, क) शासकीय हमी शुल्क रु. २४.२५ लाख पैकी भरले रु. २.१८ लाख बाकी, रु. २२.३४ लाख + व्याज रु. २२.२२ लाख एकूण थकित रु. ४४.५६ लाख, ड) शासकीय कर्जाची येणे बाकी रु. ९०४.९४ लाख

वरील तपशील लक्षात घेता कारखान्याला शासनाकडून मिळणारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य भरीव असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील तरतुदीनुसार आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. गवसे हा साखर कारखाना 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो. सबब अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर, डॉ. पी. एल. खंडागळे यांचा निर्णय योग्य असून कारखान्याने माहिती देणे आवश्यक आहे. मात्र मूळ अर्जदाराने अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचा व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन देण्याचा पर्याय कारखान्याला उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेन्टस्, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे ४११ ००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३८/पुणे + ११३९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/१०/२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेन्टस्, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्री. व.मा.मसके

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१,
सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.देवानंद भ. कुरणे
**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्रीमती निर्मला धायगुडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/७/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे या अपिलाची सुनावणी दि. २३/१०/२००८ रोजी घेण्यात आली.

कोल्हापूर महानगरपालिकेने वितरीत केलेला टीडीआर संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. रमेश दिनकर पुंडे यानी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपुरी माहिती दिली व अवास्तव शुल्काची मागणी केली, अशी अपीलकर्ता श्री. रमेश दिनकर पुंडे यांची तक्रार आहे.

अपीलकर्त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले असून अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयानुसार अधिक तपशील पुरविला आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह लेखी नमूद केले आहे.

चुकविलेला मुद्रांक शुल्क भरणाऱ्यास बक्षीस मिळण्याच्या संदर्भात श्री. पुंडे यानी सह जिल्हा निबंधक,वर्ग-१ यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बावडा रोड, कोल्हापूर या कार्यालयाकडे १२४ अर्ज सादर केले असून त्यातील बक्षीसपात्र अशा ८२ प्रकरणी रु. ७४,३०७/- एवढी रक्कम धनादेशाद्वारे त्याना अदा करण्यात आलेली आहे. त्याच अनुषंगाने ते संबंधितांकडे अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असतात, असेही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी निवेदनात म्हटले आहे.

उभय बाजूंच्या निवेदनामधील आरोप-प्रत्यारोप व प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे मतभेद या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत कार्यवाही केली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

# आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राजाराम नारायण चव्हाण
मु.य.पा.वाडी, पो.माडगुळे,
ता.आटपाडी, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था, आटपाडी,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
य.पा.वाडी कृषि पत पुरवठा सोसायटी मर्यादित,
य.पा.वाडी, ता.आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७०/२०११/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.राजाराम नारायण चव्हाण यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १४ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागाव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे
पीएमटी बिल्डिंग, दुसरा मजला, कामगार न्यायालयाचे वर, स्वारगेट, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गृहपाल, शासकीय मुलांचे वसतीगृह, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागाव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा गृहपाल, शासकीय मुलांचे वसतीगृह, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे श्रीमती राजेश्वरी विठ्ठलराव साखरे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप यानी दि.१.३.१९९५ ते दि.३१.३.२००८ या काळातील शासकीय समाजकल्याण वसतीगृह, बारामती येथील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, अनुदान इ. अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. एवढी माहिती संकलीत करण्यास विलंब लागेल व त्यासाठी होणारे शुल्क भरावे लागेल, असे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. त्यानंतर शुल्क कळविले, परंतु त्यानी ते न भरल्यामुळे माहिती दिली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, शासकीय मुलांचे वसतीगृह, बारामती ता.बारामती, जि.पुणे श्रीमती राजेश्वरी विठ्ठलराव साखरे यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. अपीलकर्त्यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून माहिती अधिकाराच्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येईल याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एस.एम.इनामदार
६३९, उत्तर सदर बझार, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१६ / २०१० / सोलापूर, ७५७+७५८/२००९/२०१० |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एस.एम.इनामदार
६३९, उत्तर सदर बझार, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.शिवाजी वामन चंदनशिवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : शाळांच्या तुकड्यांना मंजूरी व अनुदान याबाबतची सन २००७ ते २०१० या काळातील माहिती मागितली होती. ती अपुरी मिळाल्यामुळे आणखी दोन अर्ज केले. परंतु माहिती मिळाली नाही. त्याबाबतची अपिलेही आयोगाकडे दाखल केली आहेत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असूनही त्याबाबत विहित मुदतीत कळविले. तसेच पदनामाने त्यानी अर्ज केला असून माहिती मागताना अध्यक्ष, बहुजन एम्प्लॉईज फेडरेशन, महाराष्ट्र राज्य, सोलापूर व द्वितीय अपील करताना श्री.एस.एम.इनामदार, अध्यक्ष, बहुजन एम्प्लॉईज फेडरेशन, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा, सोलापूर, असे वेगळे पद दिले आहे.

अपीलकर्ता यानी एकाच विषयाबाबत विविध स्वरूपाचे मुद्दे उपस्थित करून चार वर्षाची माहिती संकलित स्वरूपात मागितली आहे. अशा प्रकारे माहितीचे संकलन करून देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांचे योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आप्पासाहेब शकरराव अक्कलकोटे
२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आप्पासाहेब शकरराव अक्कलकोटे
२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.सुरेश दत्तात्रय जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्री.डि.ए.डिंगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर माहिती मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यानी केली. सन २००४ ते २००६ या कालावधीतील माहिती श्री.अक्कलकोटे यानी मागितली होती. परंतु अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची दैनंदिनी त्याना हवी असल्याचे त्यानी नंतर स्पष्ट केले. ती माहितीही संबंधितांकडून मागवून दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.डि.ए.डिंगरे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.सुरेश दत्तात्रय जाधव यांनी केले.

दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांचे दि.४.५.२०११ रोजी निधन झाल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी वृत्तपत्रातील बातमीच्या कात्रणासह आयोगास दि.१९.७.२०११ च्या पत्रान्वये अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश वसंतराव देशपांडे
प्लॉट नं.२६/१, सोलापरेनगर, टरकळी रोड, पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, ता.पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८६ /२०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश वसंतराव देशपांडे
प्लॉट नं.२६/१, सोलापरेनगर, टरकळी रोड, पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.सी.यु.जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.अविनाश हरिपंत देशपांडे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन १९७२ मध्ये मौजे कासेगाव, ता.पंढरपूर येथे दुष्काळामध्ये सामुदायिक विहिरी पंचायत समिती मार्फत खोदण्यात आल्या होत्या. त्या कोणत्या गटात आहेत व शासनाच्या कोणत्या आदेशाने त्या संबंधितांच्या मालकी हक्काच्या करण्यात आल्या याची माहिती मागितली होती. परंतु मिळाली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : अनेक विभागांशी संबंधित अशा स्वरूपाच्या माहितीची मागणी अपीलकर्ता यानी केली होती. सर्व संबंधित विभागांना, तसेच जिल्हा परिषदेकडीलही विभागाना त्याबाबत पत्रे पाठविली. परंतु माहिती मिळाली नाही.

कक्ष अधिकारी : अपीलकर्त्याच्या शेतात खड्डा आहे, विहिर नाही. परंतु 'अपूर्ण सामुदायिक विहिर' अशी नोंद व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. त्याबाबत खुलासा केला. त्यानंतर समाधान झाल्याचे त्यानी लेखी दिले आहे.

अपिलीय प्राधिकारी : कॅशबुकासह त्या काळातील कागदपत्रे तपासली असता अपीलकर्ता म्हणतात तशा प्रकारची त्यांच्या विहिरीबाबतची नोंद आढळली नाही. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना आदींनीही अपीलकर्ता म्हणतात तशा प्रकारचे अभिलेख उपलब्ध नसल्याचे लेखी कळविले आहे.

अपीलकर्त्याची मागणी वैयक्तिक स्वरूपाची व प्रशासकीय कार्यवाहीची असल्याचे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरून दिसून येते. तथापि त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने कागदपत्रांचा शोध घेऊन १५ दिवसांत अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित विभागांना पुन्हा कळविण्यात आले असून अपीलकर्त्यास मंजूर झालेल्या सामुदायिक विहिरीचा पत्रव्यवहार वा पुरावा, तसेच शासन निर्णयाचा क्रमांक, दिनांक आदी तपशील दिल्यास शोध करणे व अनुषंगिक कार्यवाही करणे सोयीचे होईल, असे अपीलकर्त्यास कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.सी.यु.जगताप यानी

दि.१५.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. परंतु अद्याप माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.१०.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीच्या संदर्भातील कागदपत्रे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी याना सादर करण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हरि आप्पा प्रक्षाळे
मु.पो. अनिलनगर, मसोबा मंदिर समोर,
वीटभट्टी जवळ, ता. पंढरपूर, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पंढरपर विभागीय कृषी अधिकारी,
कराड रोड, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कृषी कार्यालय, स्टेशन रोड, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. हरि आप्पा प्रक्षाळे
मु.पो. अनिलनगर, मसोबा मंदिर समोर,
वीटभट्टी जवळ, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कृषी कार्यालय, स्टेशन रोड, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. डी.व्ही.गुंजाळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मातोश्री शांताई औषधी व सुगंधी वनस्पती उत्पादक सहकारी संस्था, गादेगाव या संस्थेने अनुदानासाठी दाखल केलेल्या प्रस्तावाची माहिती वगळता अन्य माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, स्टेशन रोड, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. डी.व्ही. गुंजाळ यानी दिली होती. ऊर्वरित माहिती मिळावी,अशी मागणी अपीलकर्ता श्री. हरि आप्पा प्रक्षाळे
यानी केली. उपलब्ध माहिती दिली असून अपीलकर्त्यास हवी असलेली अन्य माहिती एका आठवडयात देण्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, स्टेशन रोड, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. डी.व्ही.गुंजाळ यानी मान्य केले. त्यानुसार 'माहिती मिळाली असून माझे समाधान झाले आहे, तक्रार नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. हरि आप्पा प्रक्षाळे यानी दि. ९/५/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. रवि प्रकाश
व्दारा शक्तीचंद बाभुरिया,
हाऊस नं. १५/२/८८०, विकास नगर, किवळे,
विसडम स्कूल जवळ, देहुरोड रोड, पुणे ४१२ १०१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
बांधकाम परवानगी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** ॲड. रवि प्रकाश<br>व्दारा शक्तीचंद बाभुरिया, हाऊस नं. १५/२/८८०, विकास नगर,<br>किवळे, विसडम स्कूल जवळ, देहुरोड रोड, पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. एकनाथ पांडुरंग उगीले<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,<br>बांधकाम परवानगी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे श्री. वसंत बाबुराव काची | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आमच्या घरानजीकच विकसकाने केलेल्या बांधकामामुळे आमचे ड्रेनेज अडविले गेले आहे. विकसकाने अतिक्रमणही केले आहे. त्याबाबत तक्रार केली असता कारवाई केली नाही व माहितीही विलंबाने दिली.

जन माहिती अधिकारी - सन २००३ मधील बांधकामाशी संबंधित अशी ही माहिती अपीलकर्ता याना विहित मुदतीत देऊन संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रतीही पाठविल्या. याच संदर्भात यापूर्वीही त्यानी केलेल्या अर्जांना व अपिलांना वेळोवेळी उत्तरे दिली. संबंधित विकसकाच्या बांधकामाबाबतची संपूर्ण नस्तीची छायाप्रत दिली. ड्रेनेजची परवानगी व त्याबाबतची तक्रार हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या ड्रेनेजबाबतच्या तक्रारीनुसार पाहणी करुन अहवाल दिला आहे. त्याना हव्या असलेल्या सर्व अभिलेखांचे अवलोकन करता येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. ड्रेनेजबाबतची त्यांची तक्रार हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २१ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कृष्णांत रामचंद्र शेळके (पाटील)
मु. शेळकेवाडी, पो. सोनगाव, ता. व जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कृष्णांत रामचंद्र शेळके (पाटील)
मु. शेळकेवाडी, पो. सोनगाव, ता. व जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सातारा श्री. एस.बी.निकम

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. जि. सातारा श्री.रत्नसेन किसन पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- ग्रामपंचायतीने झाडांच्या फांद्यांची विक्री, जुलै २००९ मधील ग्रामपंचायतीच्या मासिक सभांचे इतिवृत्त व सन २००५ ते २००९ अखेरपर्यंतचा वार्षिक जमाखर्च अशी माहिती दि. ९/३/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. माहिती १०७ दिवसांनंतर व अपूर्ण दिली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. ९/३/२०१० च्या अर्जानुसार उपलब्ध माहिती लेखी उत्तर न देता दि. २५/३/२०१० रोजी समक्ष दिली. तशी त्यांची स्वाक्षरी आहे. त्याना आणखी काही माहिती हवी असल्यास ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून दप्तर दाखवून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. २/८/२०१० रोजी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यांना बोलावून दि. ७/८/२०१० रोजी त्यांची स्वाक्षरी घेऊन माहिती दिली. कोणतीही माहिती नाकारली नाही.

अपीलकर्त्यांची पोहच घेऊन स्वाक्षरी असलेल्या कागदपत्रांच्या व जावक बारनिशीतील नोंदींच्या प्रती सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ११/५/२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रती सादर केल्या. त्या पाहता माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सोपान सुदाम दाभाडे
माळवाडी, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगांव दाभाडे नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ रचना सहाय्यक,
तळेगांव दाभाडे नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सोपान सुदाम दाभाडे
माळवाडी, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ रचना सहाय्यक,
तळेगांव दाभाडे नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे श्री.राहुल रामदास दिवेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एकविरा सहकारी गृहनिर्माण संस्थेत दोन व्यक्तींनी बांधकाम परवानगीसाठी केलेल्या अर्जाबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी योग्य माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अभिलेख अवलोकन केल्यानंतरही पूर्ण माहिती मिळाली नाही. संबंधित बांधकामाच्या अनुषंगाने दिवाणी न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यात ही माहिती हवी आहे.

आपण मागणी केलेली माहिती वैयक्तिक कारणासाठी असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही विषय नाही, असे अपीलकर्त्यांनी आयोगाच्या विचारणेवर नमूद केले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांना विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर दिले व आणखी माहिती हवी असल्यास अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पुन्हा अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन माहिती दिली. कागदपत्रांच्या प्रती त्याना नको असून कारणे, स्पष्टीकरण, कायेदशीर बाबींचा अन्वयार्थ अशा प्रकारची माहिती तयार करुन देण्याची त्यांची मागणी आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांच्या मागणीत सार्वजनिक हिताचा कोणताही विषय नसून स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरुपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख-अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय दिगंबर क्षिरसागर
व्दारा अभिषेक ज्वेलर्स, दत्तरोड, कुर्डुवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल/कनिष्ठ स्थापत्य,
कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५११/२०१०/सोलापूर + २४८५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल/कनिष्ठ स्थापत्य,<br>कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी,<br>ता. माढा, जि. सोलापूर श्री. रविंद्र दिगंबर वाघमारे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता म्हणून आपल्यासह चौघांची नावे असली तरी त्यापैकी श्री. मिलिंद सोमनाथ डिकोळे ही एकच व्यक्ती वेगवेगळया व्यक्तींच्या सहया करुन माहिती मागणारे अर्ज करीत असतात. त्यांच्याशी आमचा संबंध नाही असे अपीलकर्ता श्री. संजय दिगंबर क्षिरसागर यानी स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा लेखापाल/कनिष्ठ स्थापत्य, कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. रविंद्र दिगंबर वाघमारे यानी केले. अपीलकर्त्यांचे तसे लेखी निवेदन सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २१/३/२०११ च्या पत्रान्वये श्री. संजय दिगंबर क्षिरसागर यानी मुख्य अधिकारी, नगर परिषद, कुर्डुवाडी यांच्या नावे दिलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा लेखापाल/कनिष्ठ स्थापत्य, कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. रविंद्र दिगंबर वाघमारे यानी दि. २७/७/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केली. 'माझ्या नावावरील सध्याच्या सर्व अर्जाबाबत आवश्यक ती माहिती मला मिळालेली असल्याने माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. त्यामुळे सदरचे सर्व अर्ज निकाली काढण्यात यावेत. तसेच यापुढे माझ्या नावावर दिलेले चुकीचे व माहित नसलेले अर्ज ग्राहय धरण्यात येऊ नये व माहिती देऊ नये. माझी खालीलप्रमाणे वैयक्तिक स्वाक्षरी असल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येऊ नये,ही विनंती', असे श्री. क्षिरसागर यानी या पत्रात म्हटले आहे.

अपीलकर्त्यांचे लेखी निवेदन लक्षात घेता माहितीच्या अधिकाराचा गैरवापर अन्य कोणीतरी करीत असल्याचे स्पष्ट होते. ही बाब गंभीर आहे. म्हणून अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. बी.एस. जगताप यानी संबंधित प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.
२. माहिती मागणीसाठी अन्य व्यक्तीच्या नावे अर्ज करुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर करणाऱ्या संबंधित व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई करुन अपिलीय प्राधिकारी

तथा मुख्याधिकारी, कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. बी.एस. जगताप यानी त्याबाबतचा अहवाल दि. ३१/८/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**२९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर मारुतीराव पंडित
कृष्णा अपार्टमेंट, फलॅट नं. २, डी.एड्. कॉलेजजवळ,
लक्ष्मीनगर, फलटण, जि. सातारा ४१५ ५२३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा न्यायाधीश-१,
जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९५/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मधुकर मारुतीराव पंडित
कृष्णा अपार्टमेंट, फलॅट नं. २, डी.एड्. कॉलेजजवळ,
लक्ष्मीनगर, फलटण, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा श्री. चंद्रशेखर नागप्पा नकाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जन माहिती अधिकारी यानी माहिती अद्ययावत व परिपूर्ण न देता जुनी व चुकीची दिली. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची सुनावणी विहित मुदतीत घेतली नाही. ७ दिवस विलंबाने माहिती दिली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी याना शास्ती व्हावी व न्यायालयाकडे शुल्कापोटी भरणा केलेली रक्कम परत मिळावी. फलटणच्या दिवाणी न्यायालयात मूळ प्रतीवरुन छायांकित प्रमाणित प्रत देण्यासाठी एका प्रतीला ५/- रुपये आकारले जातात व त्या रकमेची पावती दिली जात नाही. परंतु अशा प्रकारची रक्कम घेतली जात नाही, अशी माहिती देण्यात आली असून ती चुकीची आहे. आजही ती रक्कम घेतली जाते. न्यायालयातील कर्मचाऱ्यांना पक्षकार व वकील मंडळींकडून खिरापतीप्रमाणे पैसे वाटण्याचे कामकाज न्यायमंदिरात चालू असून या भ्रष्टाचारावर वचक बसविण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक भित्तीपत्रके कार्यालयात लावणे बंधनकारक करावे.

याच स्वरुपाचे लेखी निवेदन अपीलकर्त्यांनी सादर केले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता श्री. मधुकर मारुतीराव पंडित यांचा अर्ज दि. २/१२/२००९ रोजी प्राप्त झाला. सर्वसाधारण नियमावलीच्या स्वरुपाची माहिती व फलटण येथील न्यायालयात मूळ प्रतीवरुन छायांकित प्रती देण्यावर आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबतची माहिती त्यानी मागितली होती. त्या मुद्दयांबाबतचा अर्ज दि. ४/१२/२००९ रोजीच्या पत्रान्वये फलटण न्यायालयाकडे वर्ग केला. त्यांच्याकडून आलेली माहिती दि. ६/१/२०१० रोजी प्राप्त झाली. दि. ८/१/२०१० रोजी अपीलकर्त्यास शुल्क कळविले व त्यानी शुल्क भरल्यानंतर दि. १८/१/२०१० रोजी माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि फलटणच्या न्यायालयाकडून माहिती विहित मुदतीत आली नसताना अपीलकर्त्यास शुल्क कळविण्याची त्यांची कृती योग्य नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास ही रक्कम परत दिली गेली पाहिजे. भ्रष्टाचाराबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही. मात्र फलटणच्या न्यायालयात मूळ प्रतीवरुन छायांकित प्रमाणित प्रत देण्यासाठी शुल्क आकारले जाते की नाही, याची शहानिशा, माहितीच्या सत्यतेच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. फलटणच्या दिवाणी न्यायालयात मूळ प्रतीवरुन छायांकित प्रमाणित प्रत देण्यासाठी ५/- रुपये शुल्क आकारले जाण्याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास देण्यासाठी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, सातारा यांनी वस्तुस्थितीची शहानिशा करुन दि. १६/८/२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

३. अपीलकर्त्याकडून घेण्यात आलेली शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास परत करुन त्या बाबतचा अहवाल दि. १६/८/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हर्षद विठ्ठल लोकरे
मु. पो. एरंडोली, ता. मिरज, जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती जत, ता. जत, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगनहळळी, ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८९/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हर्षद विठ्ठल लोकरे
मु. पो. एरंडोली, ता. मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती जत, ता. जत, जि. सांगली श्री. जी.सी.खाडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगनहळळी, ता. जत, जि. सांगली श्री. बजरंग सिदू बुरुटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सन २००७ ते २०११ या कालावधीतील ग्रामपंचायतीने आकारलेली घरपट्टी, पाणी पट्टी, ग्रामसभेमधील ठराव इ. माहिती मागितली होती. ती अपुरी व चुकीची दिली. जमाखर्चाची अचूक माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी दोन अर्जांद्वारे माहिती मागितली होती. त्याबाबतचे एकच अपील केले आहे. दि. ११/६/२०१० च्या त्यांच्या अर्जाला दि. १५/६/२०१० रोजी उत्तर देऊन शुल्क कळविले. शुल्क भरल्यानंतर माहिती यु.पी.सी.ने पाठविली. नंतर रजिस्टर पोस्टाने पाठविली. दोन्हीची पोहोच सादर करीत आहे. माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितल्यामुळे अपिलीय प्राधिकारी यांनी छायांकित प्रती दिल्या. गावातील जागा त्याना बीअर शॉपीसाठी दिली नाही व त्यांचे अतिक्रमण काढले, म्हणून दबाव आणण्यासाठी व त्रास देण्यासाठी ते अशा प्रकारचे अर्ज सतत करीत आहेत. त्यानी ग्रामसेवकाकडे १७ अर्ज व पंचायत समितीकडे ७ अर्ज केले आहेत.

अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली आहे. माहिती मिळाल्याची कोणत्याही कागदपत्राची पोहोच देणारी सही ते करीत नाहीत. शुल्क भरल्याचे चलनही ते देत नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. माहिती मागणीच्या दोन अर्जांवर एकत्रित अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. तसेच अपीलकर्त्यांचा उद्देश माहिती मिळविण्याचा नसून माहितीच्या अधिकाराचा अयोग्य वापर करीत आहेत असे दिसून येते. ही प्रवृत्ती माहितीच्या अधिकाराच्या विधायक परिणामाच्या दृष्टीने मारक आहे. म्हणून अपीलकर्त्यास कडक ताकिद देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण तुकाराम मोरे
मु.तक्रारवाडी, पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत तक्रारवाडी,
पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८६ /२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण तुकाराम मोरे
मु.तक्रारवाडी, पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.आर.मुलाणी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत तक्रारवाडी,
पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.विलास किसन अभंग

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : तक्रारवाडी या गावातील गेल्या २५ वर्षातील अधिकृत व अनधिकृत नळजोडाबाबतची माहिती मागितली होती. ती जन माहिती अधिकाऱ्यानी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर रजिस्टरची छायांकित प्रत दिली, यादी तयार करून दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.१७.५.२०१० च्या अर्जाला दि.२.६.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. शुल्क भरल्यावर माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर तीच माहिती पुन्हा रजिस्टर्ड टपालाने पाठविली. पाहणी करून गेल्या २५ वर्षातील माहिती संकलित करून देणे शक्य नाही. रजिस्टरनुसार उपलब्ध असलेली यादी दिली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि अधिक माहिती उपलब्ध असल्यास स्वतंत्र यादीच्या स्वरूपात जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास चार दिवसात पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत तुकाराम साळुंके
टाऊन प्लॅनिंग विभाग, सी.ओ.ई., शिवाजीनगर, पुणे-४११००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई,
ता.वाई, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, पसरणी,
ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सूर्यकांत तुकाराम साळुंके
टाऊन प्लॅनिंग विभाग, सी.ओ.ई., शिवाजीनगर, पुणे-४११००५

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई,
ता.वाई, जि.सातारा श्री.व्ही.एम.पवार,
श्री.एस.एस.जगताप, विस्तार अधिकारी

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, पसरणी, ता.वाई, जि.सातारा<br>विद्यमान श्री.अनिल बाळकृष्ण ढमाळ, तत्कालीन-श्री.बाळू खाशाबा चव्हाण |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : शौचालयासाठीचे अनुदान व त्या अनुषंगाने केली गेलेली बांधकामे याची माहिती मागितली होती. माझ्या जागेत पाण्याची टाकी व शौचालय अन्य व्यक्तीने बांधले आहे. हे अतिक्रमण असल्याचे मोजणीमध्ये स्पष्ट करण्यात आले असूनही त्यावर कारावाई केली जात नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून संबंधित टाकी मी स्वतः जेसीबी लावून पाडली आहे.

अपिलीय प्राधिकारी : मोकळ्या जागेची नोंद व सीमांकन नसल्यामुळे असे घडले. परंतु संबंधित टाकी आता पाडण्यात आली असून तसा पंचनामा केला आहे.

टाकी पाडल्याचे अधिकाऱ्याचे निवेदन योग्य नाही. अजूनही टाकी तेथेच आहे, अशी तक्रार अपीलकर्ता यानी केली.

अतिक्रमण काढण्याची अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि माहितीच्या अचूकतेसाठी अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एम.पवार यानी समक्ष पाहणी करून छायाचित्रासह प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थितीचा अहवाल आयोगाला तीन दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. टाकीच्या बांधकामाचा काही भाग जमिनीमध्ये राहिलेला होता. दि.२.७.२०११ रोजी सरपंच आदींच्या उपस्थितीत जेसीबी मशिनने तो पूर्णपणे काढून टाकण्यात येऊन खड्डा बुजविण्यात आलेला आहे, असा अहवाल

संबंधित कार्यवाहीचा पंचनामा व प्रत्यक्ष जागेवरील कार्यवाहीनंतरच्या परिस्थितीच्या छायाचित्रांसह अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.व्ही.एम.पवार यानी दि.८.७.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. त्यानी केलेली कार्यवाही उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पंढरीनाथ अशोक हासे
सुदर्शन चेंबर्स, एन.डी.ए.रोड, नवयुग चौक,
ज्ञानेश सोसायटी समोर, वारजे माळवाडी, पुणे ४११ ०५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (इमारती),
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाकडेवाडी, पुणे ४११ ००३

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (इमारती) श्रेणी-२,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाकडेवाडी, पुणे ४११ ००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पंढरीनाथ अशोक हासे
सुदर्शन चेंबर्स, एन.डी.ए.रोड, नवयुग चौक,
ज्ञानेश सोसायटी समोर, वारजे माळवाडी, पुणे

**अपिलिय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (इमारती)
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाकडेवाडी, पुणे

| | |
|---|---|
| | यांचे वतीने श्रीमती स्नेहा प्रसन्ना हब्बू |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाकडेवाडी, पुणे या विभागाची सूत्रे स्वीकारलेपासून मंजूर झालेल्या निविदा आदि बाबतची माहिती मागितली होती. परंतु एक महिन्याची वाढीव मुदत देऊनही माहिती दिली नाही. कळविलेले शुल्क भरण्यासाठी कार्यालयात गेलो असता कोणीही उपस्थित नसल्यामुळे व्हिजिटर रजिस्टर मागितले. ते दिले नाही. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले नसल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. पंढरीनाथ अशोक हासे यानी केली.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून त्याबाबत विहित मुदतीत उत्तर दिले. निश्चित व मर्यादित कालावधीच्या माहितीची मागणी करावी अथवा कागदपत्रांची पाहणी करुन योग्य ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यांच्या दि. १०/६/२०१० च्या अर्जाला दि. ८/७/२०१० रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. व्ही. के. पाटील यानी कळविले. त्यावर अपीलकर्त्यांनी प्रतिसाद दिला नाही व प्रथम अपील केले. पुढील एक महिन्यात माहिती देण्याचा निर्णय दि. २४/८/२०१० रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी यानी दिला. त्यानंतर दि. १४/९/२०१० रोजी शुल्क कळविले. ते अपीलकर्त्यांनी भरले नाही व आयोगाकडे अपील केले, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे लेखी निवेदन त्यांच्या प्रतिनिधी श्रीमती स्नेहा प्रसन्ना हब्बू यानी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी सरसकट व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या स्वरुपात माहिती संकलित करुन देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियमात नाही. व्हिजिटर रजिस्टर नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असली तरी तसे रजिस्टर ठेवले आहे, असे प्रतिपादन श्रीमती स्नेहा प्रसन्ना हब्बू

यानी केले. या रजिस्टरची छायाप्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार व्हिजिटर रजिस्टर (अभ्यांगत नोंदवही) असल्याचे या वहीतील काही नोंदींच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी यानी दि. ७/४/२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यांची याबाबतची तक्रार निराधार ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रसेन माणिकराव पवार
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, राजभवनसमोर, औंध रोड, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
संचालनालय, गृहविभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ(पूर्व),
महाराष्ट्र शासन, मुंबई उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
संचालनालय, गृहविभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ(पूर्व),
महाराष्ट्र शासन, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रसेन माणिकराव पवार
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, राजभवनसमोर, औंध रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
संचालनालय, गृहविभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ(पूर्व),
महाराष्ट्र शासन, मुंबई श्री.बाळासाहेब बबन दौंडकर

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय, गृहविभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ(पूर्व), महाराष्ट्र शासन, मुंबई श्री.राजेंद्र रामचंद्र मावळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन १९८५ ते २००५ या काळात कारागृह विभागात मी काम केले. शासन- निर्णय असूनही मला सेवाज्येष्ठता दिली नाही. मंत्रालयाने पत्र दिल्यानंतरही त्याचा अर्थबोध होत नसल्याचे कारण सांगून सेवाज्येष्ठता नाकारली व माहितीही दिली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असून वर्ग-२ मधील नेमणूक मंत्रालयाशी संबंधित असल्यामुळे तसे कळविले. अनुषंगिक शासन निर्णयाच्या प्रतीही दिल्या. तथापि अपीलकर्त्यांना सेवाज्येष्ठता देण्याबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. 'समतुल्य/समकक्ष पदावर नियुक्ती झाल्यानंतर अशा समायोजीत करण्यात आलेल्या अतिरिक्त शासकीय कर्मचारी अथवा अधिकारी यांची सेवाज्येष्ठता शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरवही/१०७६/बारा, दि.२१ जून १९८२ च्या नियम ४(१) मधील तरतुदीनुसार, असा अतिरिक्त शासकीय कर्मचारी अथवा अधिकारी ज्या पदावर अथवा ज्या संवर्गामध्ये सामावून घेतला जाईल त्या पदावरील अथवा त्या संवर्गामधील नियमित नियुक्तीचा दिनांकापासून निश्चित करण्यात यावी,' असे शासन निर्णयात नमूद आहे.

अपीलकर्त्याची मुख्य मागणी सेवाज्येष्ठतेची असून ती प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत ती येत नाही. तथापि त्यांच्या पदोन्नतीबाबत केलेल्या कार्यवाहीची

व सद्यस्थितीची माहिती त्याना मिळणे हा त्यांचा हक्क आहे. १५ दिवसांत गृह विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून ही माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी. यानुसार कार्यवाही न झाल्यास संबंधित शास्तीस पात्र ठरतील, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन आणि शासकीय रासायनिक विश्लेषक डॉ.म.वि.गरड यानी अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई याना दि.१३.४.२०११ च्या पत्रान्वये कळविले व 'प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे येथील श्री.चं.मा.पवार, वैज्ञानिक सहायक यांना त्यांच्या मूळ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.१.१.१९८६ पासून सेवाज्येष्ठता देण्यात येत असून सदरची नोंद कार्यालयीन अभिलेखामध्ये घेण्यात आली आहे,'असे दि.१८.६.२०११ च्या पत्राने आयोगास अवगत केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची मुख्य मागणी पूर्ण झाल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आशिष सूर्यकांत कोरी
८९७, माने सदनिका, विनायक चौक, सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आशिष सूर्यकांत कोरी
८९७, माने सदनिका, विनायक चौक, सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर,
महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.सुनिल बाबासाहेब पाटील

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.सुनिल बाबासाहेब पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने कारखान्याचे व गावांचे दूषित सांडपाणी, कोयना धरणापासून पाणी पुरविणारा मार्ग आदी बाबींची २३ मुद्दयांची माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली यानी कोणतीही माहिती दिली नाही. मुद्दे महानगरपालिकेशी निगडित नसल्याचे उत्तर त्यानी दिले. विद्यमान जन माहिती अधिकारी यानी काही माहिती दिली, मात्र महानगरपालिका योजना राबवीत असूनही व महानगरपालिकेचा तसा ठराव असूनही परिपूर्ण माहिती मिळत नाही. नागरिकांची सनद महानगरपालिकेने प्रसिध्द न केल्यामुळे माहितीच्या अधिकारात माहिती मागवावी लागत आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता श्री.आशिष सूर्यकांत कोरी यानी वृत्तपत्रातील बातमीच्या आधारे अनेक मुद्दयांबाबत मत, अभिप्राय, स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. त्यांच्या दि.२१.४.२००८ च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी दि.५.५.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले असून काही मुद्दयांची माहिती दिली आहे व काही मुद्दे महानगरपालिकेशी संबंधित नसल्याचे कळविले आहे. वृत्तपत्रांमधील बातमीच्या अनुषंगाने स्पष्टीकरण देणे माहितीच्या अधिकारात येत नाही. इतर काही मुद्दयांची माहिती अन्य विभागांकडून प्राप्त करून घेऊन पुरविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी भाष्य करून अनेक मुद्दे मांडले असून व्यापक व विविध विभागांशी संबंधित अशा स्वरूपाची माहिती, तसेच वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने स्पष्टीकरण, अभिप्राय, खुलासा अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. 'धुळगाव योजना काय आहे, याची सविस्तर वर्णनात्मक माहिती मिळावी,' अशा स्वरूपाची ढोबळ

विचारणा ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील 'माहिती'च्या संज्ञेनुसार 'माहिती' ठरत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील. मात्र याचबरोबर माहिती मागणाऱ्या नागरिकाच्या अर्जातील सार्वजनिक हिताचा भाग लक्षात घेऊन केवळ तांत्रिकतेवर भर न देता शक्य तेवढ्या पूरक कागदपत्रांच्या प्रती स्वयंस्फूर्तीने देण्याची सकारात्मक कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी करणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली श्री.बी.के.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली श्री.बाजीराव जाधव यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**